पुण्य नगरी

# अर्थसंकल्पात संतुलित विकासाचा प्रयत्न

**मुंबई** : महाराष्ट्राचा २०२६ साठीचा अर्थसंकल्प सामाजिक कल्याण आणि आर्थिक विकास यांच्यात संतुलन साधण्याचा प्रयत्न करत आहे. सरकारने ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणे, महिलांचा आर्थिक सहभाग वाढवणे आणि पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष भर दिला आहे. राज्याच्या दीर्घकालीन आर्थिक प्रगतीसाठी या क्षेत्रांमध्ये गुंतवणूक अत्यंत महत्त्वाची असल्याचे मत आर्थिक विश्लेषक अक्षत खेतान यांनी व्यक्त केले.

अर्थसंकल्पाबाबत खेतान म्हणाले की, शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेली दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी ग्रामीण अर्थव्यवस्थेला दिलास देणारे पाऊल आहे. जेव्ह शेतकऱ्यांवरील कर्जाचा ताण कर्म होतो, तेव्हा त्याचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित राहत नाही, त संपूर्ण ग्रामीण बाजारपेठेत मागणी वाढते. यामुळे कृषी क्षेत्रात विश्वास वाढण्यास मदत होऊ शकते. माझी लाडकी बहीण योजनेबाबतही म्हणाले की, महिलांना थेट आर्थिक मदत देणाऱ्या योजन केवळ सामाजिक सुरक्षा देत नाहीत, तर कुटुंबांची आर्थिक स्थिरताही मजबूत करतात विशेषतः ग्रामीण आणि कर्म उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठ अशा योजना महत्त्वाचा आधार ठरू शकतात.